दिनांक :

प्रति,

मा.मुख्याधिकारी सो,

सातारा नगरपरिषद, सातारा.

**विषय :** नगरपरिषदा क्षेत्रातील थकीत मालमत्ता करावरील शास्ती अभय योजनेअंतर्गत माफी मिळणेबाबत.

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक –एमयुएम-2025 प्र.क्र.70/नवि-17 दिनांक.19/05/2025.

अर्जदाराचे (मालमत्ता धारकाचे) नाव :- ……………………………………………………………......

पत्ता :- ……………………………………………………………...

संगणक मालमत्ता क्रमांक :- ……………………………………………………………...

मोबाईल क्रमांक :- ……………………………………………………………...

आधार कार्ड नंबर :- ……………………………………………………………

ई-मेल आयडी :- ……………………………………………………………

महोदय,

मी अर्जदार विनंती पूर्वक अर्ज करतो की, पेठ…………………… सि.स.नं………………. संगणक मिळकत क्र……………………… ही मिळकत माझे मालकीचे आहे. सदर मिळकतीवर मालमत्ता कराची थकबाकी असणारी रक्कम खालील कारणाने भरु शकलो नाही.

……………………………………………………………………………………………

……………………………………………………………………………………………

……………………………………………………………………………………………

तरी संदर्भिय शासन निर्णयानुसार माझे मिळकतीची असणारी मिळकतीची पूर्ण रक्कम एकरक्कमी भरणेस तयार आहे. तरी शासन निर्णयानुसार दिनांक.19/05/2025 रोजीच्या एकूण शास्तीच्या 50% किंवा 50% पेक्षा अधिक शास्ती माफ करुन मिळावी ही विनंती.

1. 50% पर्यंतची माफी. ☐
2. 50% पेक्षा अधिक माफी. ☐

आपला विश्वासू,

सोबत जोडावयाची कागदपत्रे :-

1. आधारकार्डची छायांकित प्रत.
2. सन 2025-26 चे कर मागणी बिलाची छायांकित प्रत.
3. सन 2025-26 अखेर कर भरलेल्या रकमेची पावतीची छायांकित प्रत.

# सातारा नगरपरिषद, सातारा मालमत्ता करावरील शास्ती माफीसाठी अभय योजना

## नागरिकांसाठी जाहिर आवाहन

राज्यातील नगरपालिका/ नगरपरिषदा व नगरपंचायत क्षेत्रामध्ये अनेकवेळा मालमत्ता कराची थकबाकीची रक्कम जास्त असणे, मालमत्ता धारकांची आर्थिक अडचण असणे या व इतर कारणांमुळे मालमत्ता कराचा भरणा करण्यात येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 150 (अ)(1) नुसार बिलाच्या न भरलेल्या रकमेवर संबंधित नगरपरिषद / नगरपंचायत यांचेकडून दरमहा 2 % शास्ती लावण्याचे प्रावधान आहे. यामुळे मालमत्ता धारकाच्या एकूण थकबाकीमध्ये वाढ होऊन याचा विपरीत परिणाम करवसुलीवर होतो. यावर उपाययोजना म्हणून नगरपरिषदा क्षेत्रातील थकित मालमत्ता करावरील शास्ती माफ करुन कर वसुल करण्यासाठी प्रोत्साहान मिळण्याच्या दृष्टीने अभय योजना लागू करण्याबाबत शासनस्तरावर विचार करण्यात आला आहे.

त्यानुसार नगरपालिका/ नगरपरिषद व नगरपंचायती क्षेत्रातील मिळकत धारकांकरिता दि. 19/05/2025 रोजी महाराष्ट्र शासनाने मालमत्ता करावरील शास्ती माफ करणेकामी अभय योजना प्रोत्साहनात्मक राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सदर योजनेमध्ये दि. 19/05/2025 रोजी ज्या थकित मिळकतधारकांची शास्ती थकबाकी आहे, अशा मिळकतधारकास महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती अधिनियम 1965 चे कलम 150 (क) नुसार नगरपरिषद मालमत्ता करावरील शास्ती अंशत:/ पूर्णत: माफ करण्यासाठी मिळकतकराची पूर्ण रक्कम भरुन विहीत नमुन्यात अर्ज सादर करु शकतील.

1) अभय योजना एकदाच लागु आहे.
2) दिनांक 19/05/2025 पर्यंतच्या थकित मालमत्ता कराच्या रक्कमेवरील फक्त शास्तीस अभय योजना लागु आहे.
3) अभय योजना थकित मालमत्ता कर वसुलीसाठी प्रोत्साहनपर आहे.
4) जे मिळकत धारक शास्ती वगळता इतर थकित मालमत्ता कराची संपूर्ण रक्कम भरतील त्यांचे बाबतीतच शास्तीच्या सवलतीचा प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविण्यात येईल.
5) सदर योजनेचा लाभ देण्याकामी नगरपरिषदेकडे मिळकतधारकांनी प्रस्ताव / विहीत नमुन्यात अर्ज देणे आवश्यक आहे.
6) जे मिळकतधारक अभय योजनेचा लाभ घेवू इच्छितात अशांकडून विहित नमुन्यात, प्रकरणपरत्वे 50 टक्के पर्यंत किंवा त्याहुन जास्त सवलत मागणी करता परिपूर्ण प्रस्ताव नगरपरिषदेकडे सादर करावा लागेल. विहीत नमुना नगरपरिषदेच्या कार्यालयात तसेच www.sataranp.in या वेबसाईटवर किंवा my satara app वर उपलब्ध असून त्या नमुन्यात अर्ज सादर करावा.
7) दि. 19/05/2025 नंतरच्या थकबाकी शास्तीस अभय योजना लागु राहणार नाही.
8) प्रस्ताव सादर करताना आधारकार्ड छायाप्रत, मालमत्ता कराच्या मागणी बिलाची छायाप्रत व संपूर्ण कराची रक्कम भरलेल्या पावतीची छायाप्रत जोडणे आवश्यक आहे.

तसेच सन 2025 - 26 ची मालमत्ता कर व इतर करांची बिले तयार होवून बिले वाटपाचे काम सुरु केलेले आहे. तसेच ज्यांना अद्याप बिले मिळाली नसतील त्या मिळकत धारकांनी my satara app अथवा www.sataranp.in वेबसाईटवरुन बिले प्रिंट काढून किंवा स्क्रीन शॉट करुन, डाऊनलोड करुन ती अर्जासोबत सादर करावीत.

तरी थकित शास्ती वगळता कराची इतर रक्कम तात्काळ भरुन 1% सवलतीचा तसेच शास्ती माफी अभय योजनेचा लाभ घ्यावा. असे आवाहन करणेत येत आहे.